INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 16 | ISSUE - 2 | MARCH – 2026

# “छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे स्व-निर्देशित अध्ययन – एक अभ्यास”

**डॉ. शेख सुभान हसन**
सहायक प्राध्यापक, मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशन, छत्रपती संभाजीनगर.

## प्रस्तावना :-



स्वयं निर्देशित अध्ययन ( Self-Directed Learning – SDL ) ही संकल्पना प्रामुख्याने माल्कम नोवेल्स (Malcolm Knowles) या अमेरिकन प्रौढ शिक्षण तज्ज्ञाशी संबंधित आहे. त्यांनी प्रौढ शिक्षणाच्या सिद्धांताचा (Andragogy) एक भाग म्हणून ही संकल्पना विकसित केली, ज्यात शिकणारा स्वतःच्या अभ्यासाची उद्दिष्टे, संसाधने आणि मूल्यमापन ठरवतो स्वतःने स्वतःला दिशा देऊन केलेले अध्ययन म्हणजे स्वयंनिर्देशित अध्ययन. स्वयंनिर्देशित अध्ययन ही पूर्णपणे विद्यार्थ्यांवर अवलंबून असणारी एक विद्यार्थीकेंद्रित वैयक्तिक अभ्यासपद्धती किंवा अध्ययनपद्धत आहे. स्वयंनिर्देशित अध्ययन हे प्रौढ अध्ययनाला प्रेरणा देणारी अध्ययन पद्धती आहे. ज्यामध्ये मार्गदर्शन, अध्ययन आणि नियोजन यांची पूर्णतः जबाबदारी अध्ययनार्थीची असल्याचे गृहीत धरले जाते. स्वयंनिर्देशित अध्ययनपद्धतीचा वापर सर्व वयोगटातील अधयनार्थी करू शकतात. या पद्धतीने शिकणे ही स्वतः अध्ययनार्थ्यांची प्राथमिक जबाबदारी आहे.

## स्व-निर्देशित अध्ययन :-

- विद्यार्थ्यांचे स्व-निर्देशित अध्ययन म्हणजे विद्यार्थी शिक्षकावर अवलंबून न राहता, आपली शिकण्याची उद्दिष्टे, गरजा, साधने आणि मूल्यांकन स्वतः ठरवून स्वयं प्रेरणेने शिकतात. ही एक सक्रिय प्रक्रिया आहे, ज्यामध्ये विद्यार्थी जबाबदारी घेऊन, चिकित्सक विचार करून आणि उपलब्ध संसाधनांचा वापर करून ज्ञानार्जन करतात
- हिमस्ट्रा, आर. यांच्या मते, स्वयंनिर्देशित अध्ययन ही अभ्यासाची एक पद्धत असून या पद्धतीमध्ये नियोजन, प्रयत्नांची दिशा ठरविणे आणि त्याचे मुल्यपमान करणे या बाबींची प्राथमिक जबाबदारी अध्ययनार्थ्यांवर असते.
- स्वयं-दिग्दर्शित शिक्षण , ज्याला विद्यार्थी-निर्देशित शिक्षण म्हणूनही ओळखले जाते, ही एक शैक्षणिक धोरण आहे जिथे विद्यार्थी शिकण्याच्या उद्दिष्टांनुसार त्यांची स्वतःची ध्येये आणि अंतिम मुदत निश्चित करून उपलब्ध सामग्री आणि त्यांच्या स्वाध्यायाचे वितरण यावर नियंत्रण ठेवतात.
- नोवेल्सनुसार, स्वयं निर्देशित अध्ययन म्हणजे व्यक्ती स्वतः पुढाकार घेऊन, दुसऱ्याच्या मदतीने किंवा मदतीशिवाय, आपल्या शिकण्याच्या गरजा ओळखते आणि ध्येय निश्चित करते.

## स्व-निर्देशित अध्ययनाच्या पायऱ्या :-

- स्वयंप्रेरणा : अध्ययनार्थीला अध्ययनाची सुरुवात स्वयंप्रेरणेनुसारचकरावी लागते. स्वयंप्रेरणा नसेल, तर त्याला शिकण्याची इच्छाच राहणार नाही आणि त्यामुळे अध्ययनार्थी अस्वस्थ होतो. उदा., एकलव्य धनुर्विद्या शिकण्यापूर्वी अस्वस्थ झाला होता; मात्र नंतर स्वयंप्रेरणेने पुढील अध्ययनाची दिशा शोधली.

- गरजांची निश्चिती : स्वअवस्थेतून अध्ययनाच्या गरजा स्पष्ट होऊ लागतात. अध्ययनासाठीच्या विविध गरजा निर्माण झाल्यामुळे त्या गरजांची नेमकी निश्चिती अध्ययनार्थीला करावी लागते. त्यानंतर या गरजांचा तो प्राधान्यक्रम ठरवितो व पुढील अध्ययनाविषयीच्या कृतीकडे वळतो. हीच निश्चिती त्याची शिकण्यामागची स्वतःची वेगळी ध्येये किंवा उद्दिष्टे निर्माण करते.
- ध्येय, हेतू व उद्दिष्टे यांची निश्चिती : ध्येय, हेतू व उद्दिष्टे या तीन संकल्पना वरवर पाहता सारख्याच वाटतात; परंतु यांत सूक्ष्म भेद आहेत; त्यांच्या व्याप्तीत फरक आहे. ध्येय हे व्यापक असते. त्यानंतर हेतू कमी व्यापक व त्यानुसार उद्दिष्टे येतात. अध्ययनार्थी आपली ध्येय आणि उद्दिष्टे निश्चित करतो आणि त्यानुसार विविध ज्ञान व कौशल्ये आत्मसात करतो. त्यात सराव, निरीक्षण यांसारख्या कृतींचाही समावेश होतो. अर्थात यासाठी त्याला विविध स्रोतांचा शोध घेणे अपरिहार्य ठरते.
- स्रोतांचा शोध : अध्ययनाच्या विविध स्रोतांमध्ये तज्ज्ञ, मार्गदर्शन, संदर्भ पुस्तके, माहिती, सुविधा, साधने, संगणक, व्याख्याने, आंतरजाल इत्यादींचा समावेश होतो. अध्ययनार्थी स्वतःच्या उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी या स्रोतांचा आवश्यकतेनुसार शोध घेतो आणि अध्ययनाची प्रक्रिया अखंडपणे चालू ठेवतो.
- कृतीचे नियोजन (प्लॅनिंग ऑफ ॲक्टिविटीज) : कृतीचे नियोजन स्रोतांच्या शोधानुसार केले जाते. कृती अनेक असू शकतात. अभ्यासाची जागा शोधणे, वेळापत्रक तयार करणे, वाचन करणे, टिप्पणे काढणे, प्रयोग करणे, निरीक्षणे करणे, माहिती मिळविणे यांसारख्या अनेक कृती अभ्यासात येतात. अध्ययनार्थीला सर्व कृतींच्या नियोजनाचा आराखडा तयार करावा लागतो. त्यानुसार स्वयंनिर्देशित अध्ययनाकडे तो पुढील वाटचाल करतो.
- स्वयंनिर्देशित अध्ययन : स्वयंनिर्देशित अध्ययनाची ही शेवटची पायरी आहे. ठरविलेल्या नियोजनाप्रमाणे कार्यवाही करणे, येथे अभिप्रेत आहे. यातून अध्ययनार्थीमध्ये स्वयंनिर्देशित अध्ययनार्थीची विविध वैशिष्ट्ये विकसित होतात.

### स्व-निर्देशित अध्ययनाचे फायदे:

- आत्मविश्वास वाढतो: विद्यार्थी स्वतंत्र विचार करायला शिकतात.
- समस्या निवारण कौशल्य: स्वतः समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होते.
- आजीवन अध्ययन: शिकण्याची सवय आयुष्याभर टिकते.

### स्व-निर्देशित अध्ययनाच्या मर्यादा:

- स्वयंनिर्देशित अध्ययन कौशल्ये शिकण्यासाठी उपयुक्त ठरत नाही.
- ज्या व्यक्तींना अध्यनासाठी बाह्य प्रबलाची आवश्यकता असते, अशांसाठी मर्यादा येतात.
- निम्नस्तरावरील प्रेरणा असणाऱ्यांसाठी हे अध्ययन उपयुक्त ठरत नाही.
- स्वयंशिस्त नसेल, तर स्वयंनिर्देशन अध्ययन शक्य होत नाही.

### समस्या विधान :-

छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे स्व-निर्देशित अध्ययन एक अभ्यास"

### उद्दिष्टये :-

1) उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्व-निर्देशित अध्ययनाचा अभ्यास करणे.
2) उच्च माध्यमिक शाळेतील मुले आणि मुली विद्यार्थ्यांच्या स्व-निर्देशित अध्ययनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

### परिकल्पना :-

1) छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे.
2) छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या ( मुले ) स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे .

3) छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या ( मुली ) स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे.
4) छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील मुले आणि मुली विद्यार्थ्यांच्या स्व-निर्देशित अध्ययनात सार्थक फरक आढळून येत नाही.

## संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :-

1) संबंधित संशोधन हे माजलगाव शहरापुरते मर्यादित आहे.
2) संबंधित संशोधन हे केवळ माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.
3) संबंधित संशोधन हे माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्व-निर्देशित अध्ययनाशी संबंधित आहे.

## संशोधन पद्धती :-

संबंधित संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

## लोकसंख्या:-

छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील सर्व विद्यार्थी हि सदरील संशोधनाची जनसंख्या आहे

## नमुना :-

छत्रपती संभाजीनगर शहरातील ०५ उच्च माध्यमिक शाळांतील प्रत्येकी १० मुले व १० मुली अश्या एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने करण्यात आली ज्या मध्ये ५० मुले व ५० मुली यांचा समावेश आहे.

## संशोधनाची साधने :-

संबंधित संशोधनासाठी डॉ. गुगलीमी यांची प्रमाणित स्वयं-निर्देशित अध्ययन चाचणी वापरण्यात आली आहे. या चाचणीमध्ये ५२ प्रश्नाचा समावेश असून प्रत्येक प्रश्नाला नेहमी,वारंवार, कधी- कधी आणि कधीच नाही असे ०४ पर्याय देण्यात आले आहे यास अनुक्रमे ४, ३,२ आणि १ असे गुण दिलेले आहेत.

## संशोधनाची कार्यपद्धती :-

सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवडण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकडून माहिती संकलनासाठी डॉ. गुगलीमी यांची प्रमाणित स्वयं-निर्देशित अध्ययन चाचणी वापरण्यात आली व प्राप्त माहितीवर योग्य संख्याशात्रीय साधनांचा वापर करून निष्कर्ष काढण्यात आले.

## प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-

**नियम सारणी क्रमांक – 01**

**स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर दर्शवणारी सारणी**

| अं.क्र. | चल | स्व-निर्देशित अध्ययनाच्या प्राप्तांकाचा विस्तार | स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर |
|---|---|---|---|
| 01 | स्व-निर्देशित अध्ययन | 52-91 | **कमी** |
| | | 92-130 | **असमाधानकारक** |
| | | 131-169 | साधारण |
| | | 170-208 | उच्च |

**क्रमांक – 02**
**उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी यांचे मध्यमान व स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर दर्शवणारी सारणी**

| अं.क्र. | चल | गट /लिंग | विदयार्थी संख्या | मध्यमान | स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर |
|---|---|---|---|---|---|
| 01 | स्व-निर्देशित अध्ययन | **उच्च** मा. शाळेतील विद्यार्थी ( मुले व मुली ) | 100 | 174.63 | उच्च |
| | | **उच्च** मा. शाळेतील विद्यार्थी ( मुले ) | 50 | 171.82 | उच्च |
| | | **उच्च** मा. शाळेतील विद्यार्थी ( मुली ) | 50 | 177.24 | उच्च |

**सारणी क्रमांक - 03**
**उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी यांचे मध्यमान, प्रमाण विचलन, प्राप्त टि मूल्य, स्वाधीनता मात्रा , प्रमाणित टि मूल्य व सार्थकता इत्यादी दाखवणारी सारणी.**

| अं. . | चल | गट | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | प्राप्त टि मूल्य | प्रमाणित टि मूल्य (०.०५ ) | प्रमाणित टि मूल्य (०.०१) | सार्थक / असार्थक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | स्व-निर्देशित अध्ययन | **उच्च** मा. शाळेतील विद्यार्थी ( मुले ) | 171.82 | 18.27 | 98 | 1.58 | 1.98 | 2.61 | **असार्थक** |
| | | **उच्च** मा. शाळेतील विद्यार्थी ( मुली ) | 177.24 | 19.91 | | | | | |

**परिकल्पना पडताळणी :-**

1) **छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे.**
छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वयं-निर्देशित अध्ययनाचा अभ्यास केला असता सारणी क्रमांक ०१ नुसार उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे मध्यमान १७४.६३ आले असून नियम सारणी क्रमांक ०१ नुसार १७०-२०८ या विस्तारामध्ये येते ज्याच्या स्वयं-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे म्हणून संबंधीत शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागले व हे मान्य करावे लागेल कि, छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे.

2) **छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या ( मुले ) स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे .**
छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या ( मुले ) स्वयं-निर्देशित अध्ययनाचा अभ्यास केला असता सारणी क्रमांक ०१ नुसार उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे ( मुले ) मध्यमान १७१.८२ आले असून नियम सारणी क्रमांक ०१ नुसार १७०-२०८ या विस्तारामध्ये येते ज्याच्या स्वयं-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे म्हणून संबंधीत शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागले व हे मान्य करावे लागेल कि, छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या ( मुले ) स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे.

3) **छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या ( मुली ) स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे.**
छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या ( मुली ) स्वयं-निर्देशित अध्ययनाचा अभ्यास केला असता सारणी क्रमांक ०१ नुसार उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे ( मुली ) मध्यमान १७७.२४ आले असून नियम सारणी क्रमांक ०१ नुसार १७०-२०८ या विस्तारामध्ये येते ज्याच्या स्वयं-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे म्हणून संबंधीत शून्य परिकल्पनेचा

स्वीकार करावा लागले व हे मान्य करावे लागेल कि, छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या ( मुली ) स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे.

4) **छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील मुले आणि मुली विद्यार्थ्यांच्या स्व-निर्देशित अध्ययनात सार्थक फरक आढळून येत नाही.**

छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील मुले आणि मुली विद्यार्थ्यांच्या स्वयं-निर्देशित अध्ययनाचा तुलनात्मक अभ्यास केला असता सारणी क्रमांक ०३ नुसार मुले विद्यार्थ्यांचे मध्यमान १७१.८२ व प्रमाण विचलन १८.२७ आले तर मुली विद्यार्थ्यांचे मध्यमान १७७.२४ व प्रमाण विचलन १९.९१ आले या मध्यमानातील फरकाची सार्थकता ०.०५ व ०.०१ स्तरावर तपासली असता प्राप्त टि. मूल्य १.५८ आहे जे प्रमाणित टि. मूल्य १.९८ व २.६१ यापेक्षा कमी असल्याने मध्यमानातील फरक असार्थक आहे म्हणून संबंधीत शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागले व हे मान्य करावे लागेल कि, छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील मुले आणि मुली विद्यार्थ्यांच्या स्व-निर्देशित अध्ययनात सार्थक फरक आढळून येत नाही.

## मुख्य निष्कर्ष :–

1) छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील **विद्यार्थ्यांच्या स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे.**
2) छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील **विद्यार्थ्यांच्या ( मुले ) स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे .**
3) छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील **विद्यार्थ्यांच्या ( मुली ) स्व-निर्देशित अध्ययनाचा स्तर उच्च आहे.**
4) छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील **मुले आणि मुली विद्यार्थ्यांच्या स्व-निर्देशित अध्ययनात सार्थक फरक आढळून येत नाही.**

## समारोप :–

अश्या प्रकारे छत्रपती संभाजीनगर शहरातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वयं-निर्देशित अध्ययनाचा अभ्यास केला असता उच्च माध्यमिक शाळेतील मुले व मुली यांच्या विद्यार्थ्यांच्या स्वयं-निर्देशित अध्ययनाचा उच्च आढळून आला आहे तर मुले व मुली विद्यार्थ्यांचा स्वयं-निर्देशित अध्ययनाचा तुलनात्मक अभ्यास केला असता त्यांच्या स्वयं-निर्देशित अध्ययनाचा स्तरात कोणताही फरक आढळून आलेला नाही.

## संदर्भ :-

1) https://marathivishwakosh.org/50862/
2) chromeextension://efaidnbmnnnibpcajpcglclefindmkaj/https://ycmou.ac.in/media/post_image/cecf74c323b2451409163dbfeb363000.pdf
3) https://ashamodernschool.in/stages-of-a-self-directed-learning-model/
4) https://pmc.ncbi.nlm.nih.gov/articles/PMC7159015/
5) chromeextension://efaidnbmnnnibpcajpcglclefindmkaj/http://sanshodhanchetana.com/issues/Mar2017/2.pdf
6) https://iris.peabody.vanderbilt.edu/mr/module/srs/cresource/q1/p02/
7) https://agrowon.esakal.com/agro-special/students-will-learn-by-themselvesarticle-on-agrowon
8) https://www.youtube.com/watch?v=S5T4bL9d23o
9) https://uwaterloo.ca/centre-for-teaching-excellence/catalogs/tip-sheets/self-directed-learning-four-step-process